# ‘मेट्रो-३’च्या पहिल्या टप्प्यासाठी पाच गाड्या

**लोकसत्ता प्रतिनिधी**



## पहिला टप्पा डिसेंबरपासून

नव्या दाखल झालेल्या गाड्यांची चाचणी सुरू होणार आहे. दरम्यान, पहिल्या टप्प्यासाठी एकूण नऊ गाड्या आवश्यक असून आता केवळ चार गाड्या येणे बाकी आहे. या चार गाड्या लवकरच येतील आणि पहिला टप्पा डिसेंबरमध्ये वाहतूक सेवेत दाखल होईल, असा विश्वास या अधिकाऱ्याने व्यक्त केला.

**मुंबई :** भविष्यात ‘कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३’ मार्गिकेवर धावणारी चौथी आणि पाचवी मेट्रो गाडी गुरुवारी आंध्र प्रदेशातील श्री सिटीतून मुंबईमधील आरे कारशेडमध्ये दाखल झाली असून मुंबईत दाखल झालेल्या मेट्रो गाड्यांची संख्या पाचवर पोहोचली आहे. पहिल्या टप्प्यातील आरे ते वांद्रे-कुर्ला संकुलादरम्यान एकूण नऊ गाड्यांची आवश्यकता आहे. आता पाच गाड्या सज्ज असून उर्वरित चार गाड्यांची प्रतीक्षा आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) युद्धपातळीवर ‘मेट्रो ३’चे काम हाती घेतले आहे. ३३.५ किमी लांबीची ही मार्गिका दोन टप्प्यांत वाहतूक सेवेत दाखल करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात बीकेसी-आरेदरम्यान डिसेंबर २०२३ मध्ये, तर दुसऱ्या टप्प्यात बीकेसी-कफ परेडदरम्यान जून २०२४ मध्ये वाहतूक सेवा सुरू करण्याचा ‘एमएमआरसी’चा मानस आहे. सध्या एकीकडे पहिल्या टप्प्याचे काम वेगात सुरू आहे. दुसरीकडे मेट्रो गाड्या मुंबईत आणून त्यांची चाचणी घेण्याच्या कामालाही वेग देण्यात आला आहे. त्यानुसार दोन मेट्रो गाड्या गुरुवारी श्री सिटीवरून आरे कारशेडमध्ये दाखल झाल्या. याआधी तीन गाड्या मुंबईत आल्या असून त्यांची नियमित चाचणी सुरू आहे. आता मुंबईत दाखल झालेल्या गाड्यांची संख्या एकूण पाचवर पोहोचली आहे, अशी माहिती एमएमआरसीतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.